# जनकल्याण समितीला रुग्णवाहिका भेट

**पुणे** : क्लिक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने पनवेल येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीसाठी 'आरोग्य यान' उपक्रमाअंतर्गत रुग्णवाहिका दिली. रायगड जिल्ह्यातील आदिवासींना आरोग्य सेवा पुरवण्याचा उद्देश आहे. जनकल्याण समिती या भागातील दुर्बल घटकांना आरोग्य सेवा पुरवते, तसेच नियमित आरोग्य तपासणीच्या योजना राबवते. क्विक हिल टेक्नोलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर, क्विक हिलच्या सीएसआर उपक्रमाच्या प्रणेत्या अनुपमा काटकर, विठ्ठल डाके, धैर्यशील जाधव, जनकल्याण समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, उपाध्यक्ष विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.